क्र:मपोअ/प्रशि-1/प्रशि सत्र क्र.125/PSI/2024
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक
यांचे कार्यालय त्रंबकरोड, नाशिक - 422 007
आय.एस.ओ. 9001:2000 प्रमाणित
☎ (0253) 2352161, फॅक्स - 2352159
✉ director.mpa.nashik@mahapolice.gov.in /209
नाशिक, दिनांक 5 JAN 2024

**विषय** :- प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक सत्र क्र.125 मधील हजर होणाऱ्या उमेदवारांनी भरावयाचे नोंदणी प्रपत्र व वचनपत्र मपोअ येथील सेकंतस्थळावर प्रदर्शित करणेबाबत.

******

**आदेश:-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेले प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षक सत्र क्र.125 मधील 131 उमदेवार हे दि.29/01/2024 रोजी महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथे हजर होणार आहेत.

त्याअनुषंगाने सर्व उमेदवारांनी महाराष्ट्र पोलीस अकॅडमीमध्ये हजर झाल्यावर नोंदणी प्रपत्र व वचनपत्र भरणे बंधनकारक आहे. तरी प्रशिक्षणार्थी पोलीस उप निरीक्षकांचे नोंदणी प्रपत्र व वचनपत्र हे म.पो.अ. वेबसाईटवर PDF FORMAT मध्ये FLASH करावे आणि त्यासोबत खालील सुचना जोडुन सादर कराव्यात.

उमेदवारांकरीता सुचना:-

1) प्रत्येक उमदेवारांनी www.mpanashik.gov.in या संकेतस्थळावर सादर केलेले नोंदणीप्रपत्र व वचनपत्र Dowanload करुन स्वत:च्या अक्षरात भरावे आणि महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, येथे प्रशिक्षणास हजर होताना सादर करावे.
2) उमदेवारांनी सदरच्या नोंदीणीप्रपत्र व वचनपत्रावर कोणत्याही ठिकाणी स्वाक्षरी करु नये. प्रत्यक्ष प्रशिक्षणास हजर होताना उमदेवाराची स्वाक्षरी सक्षम प्राधिकाऱ्यासमोर घेण्याची तजवीज ठेवली आहे.
3) सोबत नमुना नोंदणीप्रपत्र / वचनपत्र माहितीकरीता जोडण्यात आलेले आहे.
4) सोबत उमेदवारांना दयावायाच्या मार्गदर्शक सुचना जोडण्यात आलेल्या आहेत.

**( प्रदिप जाधव )**
उपसंचालक (प्रशिक्षण),
महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक

प्रति,
उपसंचालक, आय.टी. विभाग, म.पो.अ.नाशिक

# पोलीस उपनिरीक्षक पदाच्या प्रशिक्षणास हजर राहणाऱ्या 125 बॅचच्या कॅडेट्सना मार्गदर्शक सूचना

1. पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा (मुख्य) परीक्षा 2016 मधील निवड करण्यात आलेले 131 उमदेवार दिनांक 29/1/2024 रोजी सकाळी 08.00 वाजेपावेतो महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षणासाठी हजर रहावे.

2. पोलीस उपनिरीक्षक पदासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार विहीत वेळेत व दिनांकास महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे प्रशिक्षणास हजर न झाल्यास त्यांना पोलीस उपनिरीक्षक पदासाठी हजर होण्यास स्वारस्य नाही असे समजण्यात येईल व त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

3. प्रशिक्षणामध्ये बाहयवर्ग प्रशिक्षण, शारीरीक कवायत,धावणे,पी.टी.,योगा,मैदानी खेळ यांचे प्रशिक्षण नियमितपणे करावे लागणार आहे. त्याकरीता उमेदवारांचे शारीरीक स्वास्थ्य, सुदृढ असणे आवश्यक आहे. काही उमेदवारांमध्ये कॅल्शियम,विटामीन डी,बी-2,लोह, हिमोग्लोबीनची कमतरता असल्याने त्यांना दुखापत होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रशिक्षणास हजर होतांना उमेदवारांनी खालील प्रकारची वैद्यकीय चाचणी करुन त्याचा अहवाल हजर होतांना सादर करावा.

Routine Blood Test :-

A) हिमोग्लोबीन (Hemoglobin) व बी-12
B) व्हिटॅमीन डी (Vitamin-D)
C) कॅल्शियम (Calcium)
D) HBAIC
E) CBC
F) B.S.L(Fasting & (P.P)
G) Thyroid

4. जे उमेदवार गंभीर आजारी अथवा अंथरुणाला खिळून व आजारपणामुळे दिनांक 29/1/2024 रोजी प्रशिक्षणास तात्पुरते हजर होणे त्यांना शक्य होत नसल्यास, आजारी असल्याबाबत संबंधीत जिल्हा शल्यचिकीत्सक यांचे प्रमाणपत्रासह अर्ज प्रशिक्षणास हजर होण्यापुर्वी किमान 3 दिवस आधी संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचेकडे पाठविणे आवश्यक असेल. अशा उमेदवारांना जास्तीत जास्त 15 दिवसांपर्यत उशिरा हजर होण्याबाबत परवानगी देण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. अशा परवानगी मिळालेल्या उमेदवारांनी सदरचा कालावधी संपताच प्रशिक्षणास हजर न झाल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.(शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र: मलोओ 1119/115/8 दि.02/08/2019)

5. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन परिपत्रक क्रमांक पीएसबी-310/प्रक्र626/पोल-5अ, दिनांक 08/10/2010 अन्वये पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रशिक्षणास मुदतवाढ देण्याबाबतचे धोरण आहे. त्यानुसार मुदतवाढ घेणेकरीता सादर करावयाच्या अर्जाचा नमुना सोबत जोडला आहे.

पुढील प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षणास मुदतवाढ मिळविणे गरजेचे असलेल्या उमेदवारांनी सदर परिपत्रकातील अटी व नियमात बसत असल्यास त्यांचा प्रशिक्षणास मुदतवाढ मिळण्याबाबतचा विहित नमुन्यातील अर्ज संचालक म.पो.अ., नाशिक यांचेकडील प्रशिक्षण सुरु होण्यास किमान 15 दिवस आधी पाठवावा. सहपत्र 1 प्रमाणेच्या शासन परिपत्रकातील नमूद कारणांव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षणास मुदतवाढ देय नाही. विहीत नमुन्यात नसलेल्या व संचालक, म.पो.अ., नाशिक यांना प्रशिक्षण सत्र सुरु होण्यापुर्वी किमान 15 दिवस अगोदर प्राप्त न होणाऱ्या मुदतवाढीच्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. तसेच पोलीस महासंचालक/शासनास व इतर ठिकाणी केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. मुदतवाढीबाबत अर्ज स्विकृत झाला किंवा नाही याबाबतचा खातरजमा करण्याची जबाबदारी संबधीत उमेद्वाराची राहील. पुढील प्रशिक्षण सत्रात मुदतवाढीसाठी अर्ज केला म्हणजे मूदतवाढ मिळेलच असे नाही. मुदतवाढीचे पत्र पोहोचण्यातील पोष्टाच्या व इतर प्रशासकीय दिरंगाईस महाराष्ट्र पोलीस अकॅडमी जबाबदार राहणार नाही.

**6. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीत केवळ खालील नमूद स्पर्धात्मक परीक्षांनाच बसण्यास परवानगी देण्यात येईल :-**

1. अ) महाराष्ट्र लोकसेवा आयेगामार्फत (MPSC) घेण्यात येणारी राज्य नागरी सेवा परीक्षा (Civil Services Examination) ( सध्याच्या पदांपेक्षा वरीष्ठ पांसाठीच केवळ )
   ब) केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत (UPSC) घेण्यात येणारी केंद्रीय नागरी सेवा परीक्षा Civil Services Examination)
   क) MPSC व UPSC इत्यादी विभागांच्या सध्याच्या पदापेक्षा वरिष्ठ पदासाठी परीक्षा

7. प्रशिक्षणास रुजु झालेनंतर उपरोक्त स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा देण्यासाठी नाशिक याच परीक्षा केंद्राची निवड करावी. केवळ नाशिक या परीक्षा केंद्रावरच प्रशिक्षणादम्यान परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल, परीक्षेसाठी **नाशिक केंद्र नसल्यास** मुंबई केंद्राची निवड करावे. **याव्यातिरिक्त इतर केंद्र निवडल्यास परीक्षेस असण्याची परवानगी दिली जाणार नाही**.

8. शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा वापर करण्यातबाबतच्या शासन निर्णय महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग कडील शासन परिपत्रक क्र.मभावा-2018/प्र.क्र.47/भाषा-2, दि.07 मे, 2018 मधील तरतूदी/ सुचना सर्व प्रशिक्षणार्थी यांना लागु राहतील.

9. अकॅडमीमध्ये प्रशिक्षणार्थीनी इस्त्री, हिटर, स्टिमर, केटल, टोस्टर, आदी विदयुत उपकरणे सोबत आणू नयेत.

10. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे हजर झाल्यानंतर संबधित उमदेवारास गृहपाल (वसतीगृह प्रभारी) हे निवासाची जागा, कॉट व मॅट्रेस उपलब्ध करून देतील. प्रशिक्षणार्थीनी अकॅडमीमध्ये हजर होतांना पुर्ण बाहयांचा पांढरा

शर्ट व पांढरी पॅन्ट (White full sleeves shirt & white trousers (प्रत्येकी 2 नग) आणावेत.